# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबई-गोवा महामार्गावर वाहतुकीची होणारी कोंडी व अपघातांची वाढती संख्या

**(१) ३६८७४ (१८-०१-२०१६). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे, महाड, नागोठाणे ही ठिकाणे अत्यंत धोकादायक असल्याने उक्त मार्गावरील वाहतुकीची होणारी कोंडी व अपघाताची वाढती संख्या लक्षात घेता मृत्यूचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बैठक घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वाहतुकीची होणारी कोंडी व अपघाताची संख्या कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१९) :** (१) मुंबई गोवा महामार्गावरील पळस्पे सर्कल या ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग क्र. ४, ४-ब, १७ व ६६ असे चार मार्ग एकत्र मिळत असल्याने त्या ठिकाणी वाहनांची प्रचंड वर्दळ असते. मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे, महाड व नागोठाणे हद्दीत गत दोन वर्षात झालेल्या अपघातांची आकडेवारी पुढीलप्रमाणे :-

| सन | अपघात | मयत | जखमी |
|---|---|---|---|
| २०१७ | ३९५ | ८३ | २४१ |
| २०१८ | ३८५ | १०५ | २६६ |

(२) उक्त मार्गावरील अपघात टाळण्यासाठी तसेच विविध उपाययोजना करण्यासाठी वेळोवेळी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि सार्वजनिक बांधकाम विभागाशी तसेच सदर कंपन्यांचे कंत्राटदार यांचेशी समन्वय साधून बैठकीचे आयोजन करण्यांत येते.

(३) मुंबई गोवा महामार्गाच्या दुरुस्तीचे व चौपदीकरणाचे काम सुरु असल्याने बऱ्याच ठिकाणी डायव्हर्शन कराफन वाहतूक वळविलेली आहे.

महामार्गावर वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून पेण हायवे चौकी, वडखळ नाका, वाकण फाटा, कोलाड नाका, माणगांव, लोणेरे फाटा, महाड व पोलादपूर येथील वाहतूक पॉईंटवर वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली असून त्यांच्याकडून वाहतूक नियंत्रणाचे काम केले जाते. तसेच महामार्ग पोलीस मदत केंद्र, पळस्पे, वाकण, महाड यांचेकडून तसेच स्थानिक पोलीसांची गस्त चालू असते. शनिवार, रविवार तसेच इतर सलग सुटटयांचे दिवशी उपरोक्त ठिकाणी जादा वाहतूक पोलीसांचे मनुष्यबळ नेमून वाहतूक सुरळीत ठेवली जाते.

पळस्पे सर्कल या ठिकाणी रात्रीच्या वेळी अंधारात वाहनांचा अपघात होऊ नये म्हणून हायमास्ट उभारण्यांत आले असून वाहनांची गती नियंत्रीत ठेवण्यासाठी गतिरोधक बसविण्यांत आले आहेत. तसेच पांढरे पट्टे मारुन कॅट आईज बसविण्यांत आलेले आहेत. यामुळे अपघातांची संख्या नियंत्रणात आलेली आहे.

मोटार वाहन अधिनियमांचा भंग करणाऱ्या वाहनाचालकांवर दररोज कायदेशीर कारवाई केली जात आहे. गत दोन वर्षातील अशा प्रकारच्या कारवाईची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

| सन | केसेस | दंड (रू.) |
|---|---|---|
| २०१७ | ९५३२ | २८,८५,००० |
| २०१८ | ११२८९ | २७,०६,१०० |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील ठिकठिकाणच्या उड्डाणपुलाखाली मोठ्या प्रमाणात अवैध पार्कींग होत असल्याबाबत**

**(२) ६३७३८ (१५-०५-२०१७). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ठिकठिकाणच्या उड्डाणपुलाखाली मोठ्या प्रमाणात अवैध पार्कींग केली जात असल्याबाबतची बाब माहे मे, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उड्डाणपुलाखाली अवैध पार्कींग बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१९) :** (१) मुंबईतील निरनिराळया उड्डाणपुलाखाली मोठ्याप्रमाणात अवैध पार्किंग केली जात असल्याबाबत मे २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आलेले नाही. तथापि, उड्डाण पुलाखाली अवैध पार्किंगबाबत मा.उच्च न्यायलयात जनहित याचिका क्रंमाक १००/२०१५ व ४०२७/२०१३ न्यायप्रविष्ठ आहे.
(२) व (३) मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.२७.०६.२००८ रोजी झालेल्या बैठकीत उड्डाणपुलाखालील जागेत सामाजिक संस्थाच्या माध्यमातून सुशोभिकरण, तसेच वाहतूक पोलिसांच्या चौक्या निर्माण करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिकेच्या (जनहित याचिका क्र.१००/२०१५ व ४०२७/२०१३) सुनावणीमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उड्डाणपुलाखालील पार्किंग बंद करण्याच्या सुचना दिल्या आहेत. सदर आदेशाच्या अनुषंगाने मुंबईतील उड्डाण पुलाखालील जागेवर अतिक्रमण करून उभी केलेली वाहने हटविण्यासाठी मुंबई महानगरपालिका, मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना मुंबई पोलिस दलाकडून योग्य ते सहकार्य व बंदोबस्त पुरविण्यात येतो.तसेच अनाधिकृत उभ्या असलेल्या वाहनांवर वाहतूक विभागाकडून कार्यवाही करण्यात येते
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पोलीस कोठडीत अनैसर्गिक मृत्यूस बळी पडलेल्या कैद्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात

**(३) १०२६२२ (०६-०१-२०१८). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सन २०१२ पासून पोलीस कोठडीत अनैसर्गिक मृत्यूस बळी पडलेल्या कैद्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयात माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सुमोटो जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२-१५ दरम्यान महाराष्ट्रातील तुरुंगात सर्वाधिक अनैसर्गिक मृत्यू झाल्याबाबत नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो तर्फे प्रसिद्ध झालेल्या अहवालात नोंदविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य सन १९९९ पासून सतत १६ वर्षे (१९९९-१५ या काळात एकूण ३७३ कोठडीतील मृत्यू उघडकीस आले) कोठडीतील सर्वाधिक मृत्यू प्रकरणी सर्वोच्च स्थानी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सर्व कोठडीतील मृत्यू प्रकरणी चौकशीअंती दोषींवर कारवाई करण्याबाबत व असे प्रकार रोखण्यासंदर्भात शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०७-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील कारागृहात अनैसर्गिक मृत्यु झालेल्या कैद्यांच्या कुटूंबियांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मा.मुंबई उच्च न्यायालयात माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये सुमोटो जनहित याचिका दाखल आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सन १९९९ ते २०१५ या कालावधीत एकूण ३७३ पैकी ११६ मृत्यु हे पोलीस कोठडीतील असून उर्वरित २५७ मृत्यु हे न्यायालयीन कोठडीतील आहेत.

(४) कारागृहामध्ये मृत्यु झालेल्या बंद्यांचे प्रकरण निहाय जिल्हादंडाधिकारी व न्यायदंडाधिकारी यांच्यामार्फत चौकशी करण्यात येते व चौकशीमध्ये कारागृह अधिकारी / कर्मचारी दोषी आढळून आल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येते.

कारागृहामध्ये अशाप्रकारची घटना घडू नये म्हणून सेल्फ हेल्प ग्रुप स्थापन करुन असामान्य वर्तणूक / आत्महत्याप्रवण/हिंसक वृत्तीचे बंद्याचा शोध घेण्यात येतो.

अध्यक्ष, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचेमार्फत सर्व कारागृह उपमहानिरीक्षक/कारागृह अधिक्षक/कारागृह वैद्यकिय अधिकारी यांचेकरीता कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

पोलीस कोठडीतील मृत्यु रोखण्यासाठी शासन, पोलीस महासंचालक कार्यालय व अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सर्व पोलीस घटकांना वेळोवेळी परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय नोकरीत भूकंपग्रस्त प्रवर्गासाठी असलेला अनुशेष भरण्याबाबत

**(४) १०२६९८ (०६-०१-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **भुकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय नोकरीत भूकंपग्रस्त प्रवर्गासाठी असलेला सन १९९३ पासूनचा संपूर्ण अनुशेष भरण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतीनिधिनी मा.भूकंप पुनर्वसन मंत्री महोदयाकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रवर्गाच्या शासनाच्या विविध विभाग व स्थानिक स्वराज संस्था महामंडळे आदीसह सर्व विभागात एकूण किती पदांचा अनुशेष आहे,

(३) असल्यास, सदरचा अनुशेष भरून भूकंपग्रस्त लाभार्थ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०६-२०१९) :** (१) होय.

(२) लातूर जिल्हयात अनुशेष शिल्लक नाही. उस्मानाबाद जिल्ह्यांतर्गत एकुण ४९ पदांचा अनुशेष शिल्लक आहे. पुढीलप्रमाणे :-

| समांतर आरक्षण घटक प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त (गट क व ड) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | कार्यालयाचे नाव | संवर्ग | समांतर आरक्षण घटक (म.लो. आयोगाचे कक्षेबाहेरील) | आरक्षण लागु केल्याचा दिनांक | वर्ष निहाय पदभरती करण्यात आलेली पदे | विहीत आरक्षणानूसार निश्चित केलेली पदे | समांतर आरक्षणाची प्रत्यक्षात थेट/विहीत मार्गाने भरण्यात आलेली पदे | विहीत संख्येपेक्षा कमी पदे भरण्यात आलेली असल्यास कारणे | शिल्लक अनुशेषाची पदे | अभिप्राय (आवश्यकतेनूसार निवड यादी) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद | तलाठी | भूकंपग्रस्त | १७.११.१९९४ | ० | २ | ० | ० | २ | - |
| २ | | शिपाई | भूकंपग्रस्त | १७.११.१९९४ | ० | १ | ० | ० | १ | - |
| ३ | कार्यकारी अभियंता सा. बा. विभाग उस्मानाबाद | शिपाई | भूकंपग्रस्त | १७.११.१९९४ | ० | २ | ० | ० | २ | - |
| ४ | सहायक अधिक्षक अभियंता उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ उस्मानाबाद | क व ड | भूकंपग्रस्त | १७.११.१९९४ | १५ पैकी ०२ | १३ | २ | ० | १३ | - |
| ५ | विभाग नियंत्रक रा.प.उस्मानाबाद | चालक | भूकंपग्रस्त | १७.११.१९९४ | ५ | १७ | ५ | ० | १२ | - |
| | | वाहक | भूकंपग्रस्त | १७.११.१९९४ | १३ | १७ | १३ | ० | ४ | - |
| | | यांत्रिकी | भूकंपग्रस्त | १७.११.१९९४ | २ | ४ | २ | ० | २ | - |
| | | प्रशासकीय | भूकंपग्रस्त | १७.११.१९९४ | १ | ३ | १ | ० | २ | - |
| ६ | जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परीषद उस्मानाबाद | आरोग्य सेवक (महिला) | भूकंपग्रस्त | १७.११.१९९४ | ० | १३ | ० | ० | १३ | - |

(३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.न्यायप्र १००९ / प्र.क्र.२०२ / ०९ / १६ अ, दि.२७.१०.२००९ नुसार भुकंपग्रस्त व प्रकल्पग्रस्त यांच्या नेमणुका जाहिराती देऊन संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेव्दारे गुणवत्तेनुसार नेमणुका करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, तसेच भुकंपग्रस्तांसाठी लागू केलेल्या २% समांतर आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने अद्ययावत सूचना शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १११८/प्र.क्र.३३२/१६ अ, दि.०६.०९.२०१८ अन्वये सर्व प्रशासकीय विभागांच्या निदर्शनास आणलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरे खुर्द (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे टँकर व ट्रॅक्टर यांचा झालेला भीषण अपघात**

**(५) ११०४६९ (२४-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-पंढरपूर पालखी मार्गावरील नीराजनीक पिंपरे खुर्द (ता.पुरंदर, जि.पुणे) येथे टँकर व ट्रॅक्टर यांचा भीषण अपघात होऊन ३ ऊसतोडणी कामगार ठार होऊन २० जण जखमी झाल्याचे दिनांक १६ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघातात मृत्यु पावलेल्या व गंभीर जखमी झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

पुणे-पंढरपूर पालखी मार्गावर नीराजनीक पिंपरी खुर्द ता.पुरंदर, जि.पुणे येथे झालेल्या अपघातात अहमदनगर जिल्ह्यामधील दोन ऊस तोडणी कामगार मृत्यू पावले असून अन्य १२ कामगार जखमी झाले आहेत. तसेच बीड जिल्ह्यातील दोन ऊस तोडणी कामगार मृत्यू पावले असून अन्य ८ कामगार जखमी झालेले आहेत.

(२) व (३) सदरहू अपघातामधील जखमी व्यक्तींना तसेच मयत झालेल्या अपघातग्रस्तांच्या कुटुंबियांच्या वारसांना मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतुन मदत मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही जिल्हाधिकारी अहमदनगर व बीड यांचेकडून करण्यात येत आहे.

---

**मुंबई येथे 'आपले सरकार' या संकेतस्थळाच्या माध्यमातून मोफत वाय-फाय सेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याबाबत**

**(६) १२१३७३ (२९-०७-२०१८). श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई ऑनलाइन करण्यासाठी शासनाने आपले सरकार या संकेतस्थळाच्या माध्यमातून मोफत वाय-फाय सेवा उपलब्ध करून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षभरात १ कोटी ७० लाखाहून अधिक मुंबईकरांनी या सेवेचा लाभ घेताल असून त्यासाठी एकुण ४० कोटींचे देयके आता एमएमआरडीएला भरावे लागणार असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वायफाय सेवेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे. आपले सरकार मुंबई वाय-फाय सेवा प्रकल्प शासनाने २०१६-१७ पासून राबविला असून याद्वारे मुंबईतील जनतेला उच्च क्षमतेची इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाकरिता लागणारा निधी एमएमआरडीएमार्फत उपलब्ध करण्यात येणार आहेत.

(२) सदर प्रकल्प शासनाच्या महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फत हाताळण्यात येत आहे. प्रकल्पाची एकूण किंमत रु.१७८ कोटी असून पाच वर्षाकरिता सेवा उपलब्ध होणार आहे. एमएमआरडीएने आतापर्यंत प्रकल्पाकरिता रु.४० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला असून देयकानुसार आतापर्यंत रु.२६ कोटी इतका निधी खर्च झाला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील बांधकाम कामगार व त्यांचे पाल्य शासनाच्या विविध योजनेपासून वंचित राहत असल्याबाबत

**(७) १२८२९५ (१०-१२-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा कामगार अधिकाऱ्यांच्या ढिसाळ कारभारामुळे व हलगर्जीपणामुळे बुलढाणा जिल्ह्यातील अनेक बांधकाम कामगार व त्यांचे पाल्य कामगार विभागाच्या विविध योजनांच्या अनुदानापासून वंचित असल्याची बाब दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपरोक्तबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार शासनाने अनुदानापासून वंचित ठेवणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्याबाबत तसेच बांधकाम कामगार व त्यांच्या पाल्यांना कामगार विभागाच्या विविध योजनांच्या अनुदानाचे लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (१४-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही,

बुलढाणा जिल्ह्यामध्ये सन २०१७-१८ मध्ये ४५९ पात्र बांधकाम कामगारांना विविध योजनाचे लाभ देण्यात आले आहेत. तसेच, माहे ऑक्टोबर, २०१८ पर्यंत ८२९ पात्र बांधकाम कामगारांना विविध योजनांचे लाभ देण्यात आले आहेत. चालू वर्षाची लाभार्थ्यांची संख्या ही मागील वर्षाच्या तुलनेत दुप्पट आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ. धार (जि.जळगांव) आंदोलनाप्रसंगी बस पेटवल्याबाबत**

**(८) १२९३४७ (१०-१२-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धार (जि.जळगांव) येथील मागील काही महिन्यात घडलेल्या वेगवेगळया आंदोलनाप्रसंगी वाहनचालकांना बस मधून खाली उतरवून बस पेटवण्याचे प्रकार घडल्यामुळे वाहनचालकांचे मनोबल खचले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात वाहनचालकांना योग्य सुविधा नसल्याने अनेक अडचणी येत असून माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या प्रकरणात चालकांचा हदयविकाराने मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१९) :** (१) हे खरे नाही. सदरची घटना मोजे धार (जि.जळगांव) येथे घडलेली नाही. परंतू जळगांव शहरात हायवे क्रमांक ६ येथे आंदोलनाप्रसंगी वाहन चालक, वाहक तसेच प्रवासी यांचेसह बस पेटवून देण्याचा प्रयत्न करण्याचा प्रकार घडला. त्याअनुषंगाने जिल्हापेंठ पोलीस स्टेशन येथे भाग-५ गु.रनं.०१/२०१८ भादंवि क.३०७, ३५३, १४३, ३२३, ३३६, ३४१, ३४७, ४२१ सह क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट क.७ सह सार्व. मालमत्ता हानी प्रति. अधिनियम १९८४ चे क.३ (इ) ४, नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील दोन आरोपीतांविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदरहू गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(२) व (३) मौजे धार, ता.धरणगांव, जि.जळगांव या गावांसाठी मुक्कामी असलेली एसटी बस घेऊन चालक त्यांचे सोबतचे वाहकासह गावातील हनुमान मंदिराजवळील रोडवर उभी करुन गाडीमध्येच रात्रीचा मुक्काम करत असताना झोपेतच बसचालक यांची तब्बेत अचानक खराब झाल्याने व हृदय विकाराचा झटका आल्याने ते मयत झालेची घटना घडलेली आहे. सदर मयत बसचालक यांचे मृत्यू संदर्भात धरणगांव पोलीस स्टेशन येथे अ.मृ.रजि.नं.५९/२०१८ क्रि.पो.को.क.१७४ नुसार अकस्मात मृत्यू दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली असून. सदर प्रकरण उपविभागीय दंडाधिकारी, एरंडोल यांच्याकडे समरी मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कळवण (जि.नाशिक) येथील पुनंद डावा व उजवा कालवा उपविभाग कार्यालयास लागलेल्या आगीमुळे झालेले नुकसान**

**(९) १३१२१८ (०६-१२-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या गिरणा नदी खोरे प्रकल्प विभागाच्या पुनंद डावा व उजवा कालवा उपविभाग कार्यालयास दिनांक १९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागून या आगीमध्ये संपुर्ण दस्तऐवज जळून राख झाल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकाच वेळी या दोन्ही उपविभाग कार्यालयास लागलेल्या आगीची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.
सदर आग दोन्ही कार्यालयाच्या रेकॉर्ड रूम मध्ये लागली असून त्यात जूने रेकॉर्ड, लाकडी रॅक, कॅम्प्युटर, सी.पी.यु. टेबल खुर्च्या व इतर सामान अर्धवट जळाले आहे.
(२) व (३) सदर दुर्घटनेबाबत कळवण पोलिस स्टेशन येथे अकस्मात जळीत नंबर १/२०१८ दाखल करण्यात आला आहे.तसेच दि. १२/१०/२०१८ रोजी गु.र.न. ११५/२०१८ भा.द.वि. कलम ४३६ व ४२७ अन्वये अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणाचा तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील पी अँड टी कॉलनी येथे चालणाऱ्या असामाजिक प्रकारांना प्रतिबंध करण्याबाबत**

**(१०) १३५०२६ (११-०७-२०१९). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील पी अँड टी कॉलनी येथे रात्रीच्या वेळी सार्वजनिक ठिकाणी काही लोक मद्यपान तसेच ड्रग्ज घेत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रात्रीच्या वेळी महिलांना सदर भागात ये जा करणे खूप कठीण झाले असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी वारंवार तक्रार करूनही याबाबत पोलीसांकडून केवळ तात्पुरती कारवाई केली जाते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या समाजविघातक प्रकारांना प्रतिबंधीत करण्यासाठी शासनाकडून कोणती कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे,

दि.९.५.२०१९ रोजी विलेपार्ले पोलीस ठाणे हद्दीत दु.२.१५ ते २.३० या कालावधीत अंमली पदार्थाचे सेवन करताना ३ इसम, अनुक्रमे अमन आझाद तुसामढ, सुरेश मुर्ती अदितद्रविड व अतुल दिपक कागडा हे आढळल्याने त्यांचे विरुध्द कलम ८ (क) सह २७ एन.डी.पी.एस. कायदा, १९८५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यामध्ये आरोपीतांवर दोष सिध्द झाल्याने, मा. महानगर दंडाधिकारी यांनी रुपये १५००/- दंड व दंड न भरल्यास ३० दिवस साध्या कैदेची शिक्षा सुनावली आहे.

(२) हे खरे नाही.

या भागात रात्रीच्या वेळी महिलांना ये-जा करणे कठिण होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी किंवा नागरिकांकडून कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याची पोलीस ठाण्यात लेखी नोंद नाही.

(३) समाजविघातक प्रकारांना प्रतिबंध करण्यासाठी पी. ॲन्ड टी. कॉलनी परिसरात विलेपार्ले पोलीस ठाण्याचे १) दिवसपाळी / रात्रीपाळी कर्तव्यावरील पोलीस निरीक्षक, २) बिट अधिकारी, ३) बिट मार्शल, ४) निगराणी पथक, ५) गुन्हे प्रकटीकरण पथक, ६) वायरलेस मोबाईल यांची नेमणूक करण्यात आली असुन त्यांच्या मार्फतीने सातत्याने गस्त ठेवण्यात आली आहे. ७) सुरक्षा रक्षक मंडळाचे एकुण ६ सुरक्षा रक्षक सुरक्षेकरीता नेमणुकीस असुन ते तीन सत्रामध्ये फिरती गस्त करीत असतात. कोणी इसम गैरकृत्य करताना मिळुन आल्यास त्यांचेवर तात्काळ कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील विलेपार्ले (पश्चिम) येथील नानावटी शाळेजवळील परिसरात होत असलेली अंमली पदार्थांची विक्री

**(११) १३५०३१ (११-०७-२०१९). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विलेपार्ले (पश्चिम) येथील नानावटी शाळेजवळील परिसरात अंमली पदार्थांच्या विक्रीचे प्रमाण वाढले असल्याची गंभीर बाब माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यसनाधीन व्यक्तींकडून चोरीच्या घटनांचे प्रमाण वाढत असून याबाबत संबंधित पोलीस ठाण्यात वारंवार तक्रार करूनही कोणत्याच प्रकारची कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरात पोलीस चौकी नसल्यामुळे या अंमली पदार्थ विकणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यात पोलीस प्रशासनाला अपयश येत असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून अंमली पदार्थ विक्री करणा-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच विलेपार्ले (पश्चिम) येथील नानावटी शाळेजवळ पोलीस चौकी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०८-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

सन २०१९ च्या उपलब्ध अभिलेखानुसार नानावटी शाळेजवळील परिसरात, विलेपार्ले (प) या ठिकाणी अंमली पदार्थ विक्री होत असल्याबाबतची तसेच अंमली पदार्थ व्यसनाधीन व्यक्तींकडून चोरीच्या घटनाबाबत अंमली पदार्थ विरोधी कक्ष तसेच सांताक्रुज पोलीस ठाणेस अद्यापपर्यंत तक्रारी अर्ज प्राप्त झालेला नाही.

(३) हे खरे नाही.

सांताक्रुझ पोलीस ठाणे अंतर्गत विलेपार्ले पश्चिम रेल्वे स्टेशन जवळ नियतक्षेत्र क्र. तीन ची पोलीस बिट चौकी असुन सदर पोलीस बिट चौकी व नानावटी शाळेजवळील परिसर यामध्ये अंदाजे अर्धा किलोमिटरचे अंतर आहे. त्यामुळे सदर परिसरात दिवसा व रात्री पर्यवेक्षक अधिकारी व त्याचप्रमाणे बिट अधिकारी व अंमलदार यांच्यामार्फतीने तसेच मोबाईल व मार्शल वाहनावरील अंमलदाराकरवी गस्त घालण्यात येत असते. तसेच अंमली पदार्थाचे सेवन करणारे व विक्री करणाऱ्या इसमांबाबत माहिती प्राप्त होताच त्यांचा शोध घेवुन संबंधीत इसमाविरुध्द एनडीपीएस कायद्यांन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येत असते.

सन २०१९ मध्ये दिनांक ११.४.२०१९ रोजी विलेपार्ले फाटक समोरील फुटपाथ जवळ विलेपार्ले रोड स्थानकाजवळ, विलेपार्ले पश्चिम मुंबई या ठिकाणी यार मोहम्मद जमील पठाण वय ६२ वर्षे याच्या ताब्यात १५० ग्रॅम गांजा हा अंमलीपदार्थ मिळुन आल्याने त्यास अटक करुन त्याविरुद स्पेशल LAC कलम ८(क) सह २० अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) विलेपार्ले (पश्चिम) येथील नानावटी शाळेजवळ अर्ध्या किलोमीटर अंतरावर विलेपार्ले रेल्वे स्टेशन लगत बिट चौकी असल्याने सांताक्रुझ पोलीस ठाणेमार्फत नानावटी शाळेजवळ पोलीस चौकी उभारण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

नानावटी शाळा येथे महिलांचे महाविद्यालय असल्याने सदर ठिकाणी सांताक्रुझ पोलीस ठाणे येथील महिला पोलीस अंमलदार यांच्यामार्फतीने नेहमीचे मोबाईल-५ या वाहनांची सतत गस्त ठेवण्यात येत असते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळाच्या सुरक्षा रक्षकांच्या समस्यांबाबत**

**(१२) १३५०३३ (१२-०७-२०१९). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळाच्या सुरक्षा रक्षकांना किमान वेतन न दिले जाणे तसेच त्यांना पुरविले जाणारे साहित्य अनेक ठिकाणी प्रलंबित असणे अशा विविध प्रकारच्या समस्यांना सुरक्षा रक्षकांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बहुतांश सरकारी आस्थापनांमध्ये मंडळाचे सुरक्षा रक्षक घेण्याऐवजी त्याठिकाणी खासगी एजन्सीचे सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक खासगी एजन्सीची मुदत संपली असतानाही बेकायदेशीररित्या त्यांचे करार कायम केले अाहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामध्ये शासकीय अधिकारी व खासगी एजन्सीच्या मालकांचे संगनमत अाहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत सखोल चौकशी करून महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक मंडळाच्या सुरक्षा रक्षकांच्या समस्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अधिनियम २०१० मधील कलम १५ (१) नुसार राज्य शासनाची कार्यालये,संघटना आणि राज्य शासनाचे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांना महामंडळाकडून सुरक्षा घेणे अनिवार्य आहे. अवैधरित्या खाजगी सुरक्षा एजन्सी कार्यान्वित असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यास नियमानुसार त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात येते

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठाकडे एकुण ४१ हजार अपील प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(१३) १३५३७८ (११-०७-२०१९). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य माहिती आयोगाच्या पुणे, कोकण, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, अमरावती आणि बृहन्मुंबई या खंडपीठाकडे ४१ हजार अपील प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल-२०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य माहिती आयोगाकडून या सर्व प्रलंबित अपीलांची दखल घेऊन अपील निकाली काढणेकरीता आयोगाने आराखडा तयार केला आहे काय,

(३) तसेच या खंडपीठामध्ये पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून देण्यात आला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१९) :** (१) होय खरे आहे.

(२) माहिती अधिकार अधिनियमाबाबत जनतेमध्ये जागृती झाली असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर द्वितीय अपीले दाखल होत असून, प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याबाबत राज्य माहिती आयोगामार्फत विशेष मोहिम राबविण्यात आली होती.

प्रलंबित अपीलांचा निपटारा जलद गतिने करण्याबाबत मा.राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या स्तरावरुन खंडपीठांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) व (४) राज्य माहिती आयोगाच्या आस्थापनेवरील बहुतांश पदे प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतुद आहे.त्यामुळे सदर पदे प्रतिनियुक्तीने भरण्याची प्रक्रिया सतत सुरु राहते. अलिकडेच, दिनांक ०७.०६.२०१९ च्या शासनपत्रान्वये राज्य माहिती आयोगातील रिक्त पदांबाबत क्षेत्रीय कार्यालयांकडून इच्छुकता मागविण्यात आली आहे.

---

### राज्यात ३०० बोगस आयटीआय संस्थांवर कारवाई करण्याच्या केलेल्या मागणीबाबत

**(१४) १३५५२० (१५-०७-२०१९). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडे नोंदणी नसलेल्या ३०० बोगस औद्योगीक प्रशिक्षण संस्थांवर (आयटीआय) कारवाई करण्याची मागणी युवा सेनेने संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दिनांक १५ जानेवारी, २०१९ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बोगस संस्थांना शासनाने बजावलेल्या कारणे दाखवा नोटीशी नंतर अद्यापपर्यंत या संस्थांविरुध्द शासनातर्फे कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, सॉफ्टवेअर, ॲनिमेशन, आरोग्य, सौंदर्य आदी क्षेत्रातील व्यवसाय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना, शासनाने प्रमाणित केलेले प्रशिक्षण मिळावे व त्यांची परीक्षा शासना मार्फत होऊन त्यांना सरकारी प्रमाणपत्र देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्यात कृषी, पशु व मत्स्यविज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च व तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करणे आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करणे (प्रतिबंध) अधिनियम क्रमांक २० मधील प्रकरण ३ कलम ६ पोटकलम १ नुसार आदेश देण्यापूर्वी संबंधित शिक्षण संस्थेला आपले म्हणने मांडण्याची वाजवी संधी देण्यांच्या अनुषंगाने संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे समोर सुनावणी घेवून पुढील कार्यवाही करण्यांत येणार आहे.

(३) सदर अभ्यासक्रम सुरू करू इच्छिणाऱ्या संस्था व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या vti.dvet.gov.in या वेब पार्टलवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून त्याला ऑनलाईन पध्दतीने मान्यता दिली जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यात बालमजूरांचे वाढते प्रमाण रोखण्याबाबत**

**(१५) १३६३५० (१५-०७-२०१९). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यात वाढलेली दुष्काळाची दाहकता आणि कामगारांचा होत असलेला अभाव यामुळे छोट्या-मोठ्या व्यावसायिकांनी बालमजूरांना कामास ठेवल्याचे दिसून येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागात असलेल्या कामाच्या अभावामुळे मजूरांचे कुटुंबासह स्थलांतर होत आहे, बालके कमी पैशांमध्ये काम करीत असल्याने शहरातील व्यावसायिकांनी त्यांना मजूरीसाठी जुंपले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यात अशाप्रकारे बालमजूरांचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने उपाययोजना करण्याबाबत तसेच बालकांना कामावर ठेवणाऱ्या मालकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (२१-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) लातूर जिल्ह्यामध्ये बाल मजूरांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत नाही.

सुधारित बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ नुसार बाल कामगार आढळल्यास संबंधित मालकास रु.२०,०००/- ते रु.५०,०००/- इतकी रक्कम प्रति बाल कामगार दंड आकारण्याची तसेच कलम १४ नुसार ६ महिने ते २ वर्षापर्यंत सश्रम कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे.

बाल मजुरीला आळा घालण्याकरिता मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली कृतीदल स्थापन करण्यात आला असून तक्रार प्राप्त झाल्यावर त्वरित धाडसत्राचे आयोजन करुन बाल कामगारांना मुक्त करुन बाल कल्याण समितीच्या सुपूर्द केले जाते व महिला व बाल विकास विभागामार्फत त्यांचे पुनर्वसन केले जाते.

लातूर जिल्ह्यात आजमितीस ६५ धाडसत्रांचे आयोजन करण्यात आले असून १४४२ आस्थापनांची तपासणी करण्यात आली आहे. त्यातून २१ बाल कामगारांची मुक्तता करण्यात आली असून १७ व्यावसायिकांविरुध्द फौजदारी कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी शहरात (जि.ठाणे) सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत**

**(१६) १३६८७९ (१३-०७-२०१९). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहरात (जि.ठाणे) सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची आवश्यकता असल्याचा अहवाल स्थानिक पोलीस प्रशासनाकडून शासनाकडे पाठविण्यात आला असून याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री व वित्तमंत्री महोदयांकडे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा. वित्तमंत्री यांनी अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग यांना प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे तसेच भिवंडी शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) भिवंडी (पश्चिम) विधानसभा मतदार संघात १५ अतिसंवेदनशील नाक्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर शहरातील गांधी मैदान हे गांजाचे केंद्र बनल्याबाबत**

**(१७) १३७७४५ (१३-०७-२०१९). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या महानगरपालिकेचे गांधी मैदान हे महाविद्यालयीन तरुणांनी गांजाचे केंद्र केल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून स्थानिक पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१९)** : (१) व (२) कोल्हापूर शहरातील गांधी मैदान व आजुबाजुचे परिसरात नेहमीच पेट्रोलींग करण्यात येते. माहे जानेवारी २०१९ व फेब्रुवारी २०१९ मध्ये काही तरुण गांधी मैदानामध्ये बसून मोठ मोठयाने दंगा मस्ती करुन शांततेचा भंग करीत असतांना आढळून आल्याने कॉलेजकुमार व तरुण यांचेवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५९ चे कलम ११०/११७ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

दि.०४/०२/२०१९ रोजी दैनिक महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये गांधी मैदानात गांजा अड्डा महाविद्यालयीन तरुणांचा दिवसभर वावर या मथळयाखाली प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने गांधी मैदानामध्ये कोणताही प्रकार आढळून आलेला नाही. तसेच याबाबत काहीएक तक्रार दाखल नसल्याने गुन्हा दाखल नाही.

(३) विलंब झालेला नाही.

---

## आंबिवली (जि.ठाणे) येथील बंद असलेल्या मे.एन.आर.सी.लि. कंपनीच्या कामगार कर्मचाऱ्यांची थकीत देणी देण्याबाबत

**(१८) १३८३३८ (१५-०७-२०१९). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबिवली येथील बंद असलेल्या मे.एन.आर.सी.लि. (MNRCL) कंपनीच्या कामगार कर्मचाऱ्यांची रुपये ९८४ कोटी ४३ लाख इतकी थकीत देणी क्लेम कंपनी (claim company) व्यवस्थापनेने केलेला आहे, असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.एन.आर.सी.लि. कंपनीच्या कर्मचाऱ्यांची थकीत देणीचा विषय यापूर्वी बीआयएफआर (BIFR) कडे प्रलंबित होता, सन २०१४ नंतर बीआयएफआर बरखास्त झाली असून सध्या एनआरटीसी (NRTC) कडे आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, थकीत रक्कमेच्या हिशोब व त्यावर १८% व्याज असा एकूण रक्कमेचा त्यात समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २२ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास हे क्लेम कंपनीने भरून देखील हा विषय निकाली काढण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (१९-०८-२०१९)** : (१) सदर आस्थापनेस वित्त पुरवठा केलेल्या पंजाब नॅशनल बँकेने त्यांची सुमारे २९५ कोटी २८ लाख इतक्या थकित रकमेच्या वसुलीसाठी नादारी व दिवाळखोरपणा संहिता, २०१६ च्या कलम ७ अंतर्गत राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे (National Company Law Tribunal) दावा दाखल केलेला आहे. तसेच राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (N.C.L.T.) यांनी नियुक्त केलेल्या अंतरिम निर्णय व्यावसायिकाने

प्रदर्शित केलेल्या नोटीसीस अनुसरून वैयक्तिक कामगारांनी रु.६०,४३,९४,०००/, एनआरसी एम्प्लॉईज युनियन यांनी त्यांच्या सभासद कामगारांचे रु.६४,४३,००,०००/- व एनआरसी मजदूर संघ यांनी त्यांच्या सभासद कामगारांचे रु.९८३,००,००,०००/- अशा एकुण रु.११०७,८७,००,०००/- इतक्या रकमेचे दावे दाखल झाले आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) होय.

(४) व (५) सदरचे प्रकरण सद्य:स्थितीत राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाकडे (N.C.L.T.) दाखल झाले असून, त्यांनी नियुक्त केलेल्या अंतिम निर्णय व्यावसायिक यांचेकडून प्राप्त दाव्याची व त्यासोबतच्या कागदपत्रांच्या पुराव्याची छाननी सुरू असल्याचे दिसुन येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये गुन्ह्यात वाढ झाल्याबाबत**

**(१९) १३८८९६ (१३-०७-२०१९). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये माहे जानेवारी ते मार्च, २०१९ अखेर लैंगिक अत्याचाराचे ११ गुन्हे, विनयभंगाचे ४३ गुन्हे आणि सोनसाखळी चोरीचे ५ गुन्हे दाखल झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारच्या गुन्ह्यात वाढ झाल्याने या गुन्ह्यांना प्रतिबंधीत करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या व करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाशिक पोलिस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात महिलांवरील लैंगिक अत्याचार, विनयभंग व सोन सोनसाखळी चोरी अशा प्रकारच्या गुन्ह्यांना प्रतिबंधित करण्यासाठी उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत :-

• गुन्ह्याचा परिपूर्ण व तातडीने तपास करून आरोपीविरूध्द तात्काळ खटले दाखल करण्याची कार्यवाही करण्याकरीता स्वतंत्र महिला पोलीस पथक स्थापन केलेले आहे.

• शाळा, महाविद्यालये इ. ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत संबंधित व्यवस्थापनास स्थानिक पोलीस स्टेशन मार्फत कळविण्यात आले आहे. तसेच पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात ०४ निर्भया पथके नेमुन त्यांच्या मदतीने छेडछाड करणा-यांवर कारवाई करण्यात येते.

• रेल्वे स्थानके/एसटी स्टॅन्ड/महिला मेळावे/आठवडे बाजार/बाजारपेठ/देवळे/धार्मिक प्रवचने इ. ठिकाणी दामिनी पथक, निर्भया पथक मोबाईल, पोलीस स्टेशन कडील सी आर मोबाईल व पायी पेट्रोलिंग मार्फत गस्त घालण्यात येते.

• आपत्कालीन प्रसंगी पिडीत महिलांना तात्काळ पोलीसांची मदत मिळावी हा उद्देश साध्य होण्याच्या दृष्टीने "प्रतिसाद ॲप" सुरू करण्यात आलेले असून प्रतिसाद ॲपचा वापर अधिक प्रभावीपणे होणेकरीता जास्तीत जास्त प्रसिध्दी देण्यात येत आहे. तसेच महिलांसाठी टोल फ्री हेल्पलाईन सुरू करण्यात आली आहे.

• मुलींच्या आश्रमशाळा/ बालसुधारगृहे/ शाळा/ वस्तीगृहे इ. ठिकाणी संबंधीत पोलीस स्टेशन मार्फत भेट देण्यात येते.

• सोनसाखळी चोरीचे गुन्ह्यांना आळा घालण्याकरिता प्रत्येक पोलीस स्टेशनला नियमित नाकाबंदी केली जाते. त्यात वाहनाची तपासणी केली जाते व झोपडपट्टी चेकिंग केली जाते. तसेच गुन्ह्यात अटक होणारे आरोपी हे प्रत्येक आठवड्याचे शुक्रवारी सर्व पोलीस अधिकारी व गुन्हेशोध पथकाचे कर्मचारी यांना बोलावून आरोपीची आदान प्रदान स्किम राबवून आरोपी दाखविले जातात. तसेच रेकॉर्डवरील गुन्हेगार नियमित चेक केले जातात वरील कारवाई मुळे गुन्ह्यांना आळा बसलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यामधील कामगार कल्याण केंद्र बंद करण्याच्या शासनाच्या धोरणाबाबत**

**(२०) १३९१०३ (१५-०७-२०१९). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यामध्ये महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळांतर्गत सन २००८ पासून कामगार कल्याण केंद्र सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करमाळा तालुक्यातील सदर केंद्र बंद करण्याबाबत शासनाचे धोरण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व विविध शासकीय योजनांचा लाभ कामगार व त्यांच्या वारसांना मिळावा यासाठी सदर केंद्र सुरु ठेवण्याची मागणी कामगारांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त केंद्र सुरुच ठेवण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती सकारात्मक भूमिका घेतली आहे व तद्नुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (१३-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सदर केंद्र सुरु ठेवण्याची मागणी कामगारांनी शासनाकडे केलेली नाही. मंडळाच्या प्रशासकीय खर्चावर नियंत्रण आणण्याची आवश्यकता असल्याने केंद्र निहाय कामगार नोंदणी संख्येच्या अनुषंगाने आढावा घेण्याची कार्यवाही मंडळ स्तरावर सुरु आहे. तथापि, सदर केंद्र बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरगांबाद जिल्हयात ३५ जणांनी स्वातंत्रसैनिकांचे बोगस प्रमाणपत्र सादर करून शासकीस नोकरी प्राप्त केल्याबाबत**

**(२१) १३९२२१ (१५-०७-२०१९). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात ३५ जणांनी स्वातंत्रसैनिकांचे बोगस प्रमाणपत्र सादर करून शासकीय नोकरी प्राप्त केली असल्याची माहिती दिनांक १० मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार शासनाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) स्वातंत्र्य सैनिक बोगस नामनिर्देशन प्रकरणी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या चौकशी कक्षाच्या चौकशी अंती सदर ४८ जणांनी स्वातंत्र्य सैनिकांचे बोगस प्रमाणपत्र सादर करून शासकीय नोकरी प्राप्त केली असल्याचे आढळले. तसेच मा.उच्च न्यायालय यांनी न्यायालयीन याचिका क्रमांक ८००९/२०१४ अनुसार चूकीचे नामनिर्देशन होऊन शासकीय नोकरी मिळविलेले आरंगाबाद जिल्हयांतील ४८ बनावट स्वातंत्र्य सैनिक पाल्यांची शासन सेवा समाप्त करण्यासंबंधी दि.२५.०२.२०१९ रोजी आदेश दिलेले आहेत, दि. २१.०५.२०१९ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना सदर व्यक्तींना शासकीय सेवेतून त्वरीत काढून टाकण्याबाबत आदेश दिलेले आहेत व सदर ४८ जणांच्यावर शासनाची फसवणूक केल्याबद्दल फौजदारी गुन्हा दाखल करण्यासंबंधी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील सातपूर परीसरात स्वयंघोषित गुंडाकडून दहशत निर्माण केली जात असल्याबाबत**

**(२२) १३९२६४ (१३-०७-२०१९). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सातपूर परिसरात रोलेट सारख्या जुगाराचे केंद्र चालविणाऱ्या स्वयंघोषित गुंडाने सर्वसामान्य नागरिकांमध्ये दहशत पसरविण्याचा प्रकार माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशोकनगर परिसरात यापूर्वीही तीन-चार खुनाच्या घटना नुकत्याच घडल्या असतांना पुन्हा एकदा या स्वयंघोषित गुंडाकडून दहशतीचे वातावरण निर्माण केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) अशोकनगर पोलीस स्टेशन हे ठिकाण सातपूर पो.स्टे अंतर्गत येते. या ठिकाणी तसेच जानेवारी २०१९ ते आजपावेतो सातपुर पो.स्टे हद्दीत एकही खुनाचा गुन्हा नोंद नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुळजापूर (जि.उस्मानाबाद) येथील तुळजाभवानी देवस्थानातील मौल्यवान दागिने व जुनी नाणी चोरी झाल्याबाबत

**(२३) १३९२९५ (१५-०७-२०१९). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री. तुळजाभवानी देवस्थानातील ऐतिहासिक दागिन्यांची व जुनी नाणी चोरी झाल्याची तक्रार मंदिराचे पुजारी श्री.किशोर गंगणे आणि अधिवक्ता श्री.शिरीष कुलकर्णी यांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक ११ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, शासनाला प्राथमिक चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, या दागिन्यांच्या चोरीप्रमाणेच श्री.तुळजाभवानी देवस्थानातील दानपेटीच्या लिलावात झालेला कोट्यवधी रूपयांचा गैरव्यवहार आणि देवस्थानची २६५ एकर जमीन परस्पर हस्तांतर करण्याप्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने केलेल्या चौकशीचा अहवाल शासनास सादर झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशी अहवालाचे निष्कर्ष काय आहेत, यात कोणाला दोषी ठरविण्यात आलेले आहे व चौकशी अहवालानुसार दोषींवर कोणती कायदेशीर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने अप्पर जिल्हाधिकारी उस्मानाबाद, उप विभागीय अधिकारी तुळजापूर व उप जिल्हाधिकारी (सा.प्र.) यांची त्रिसदस्यीय समिती नेमण्यात आली आहे. दिनांक ५/७/२०१९ रोजी अंतिम सुनावणी घेण्यात आली असून या समितीचा अहवाल प्रलंबित आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

(४) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक २२/३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये श्री.तुळजाभवानी देवस्थानातील दानपेटीच्या लिलावातील घोटाळयाच्या प्रकरणीचा अहवाल शासनास सादर केला होता. शासनाच्या दि.४/८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणी फेरचौकशी करुन अहवाल सादर करणेबाबत निदेश दिले आहेत. तसेच, श्री तुळजाभवानी देवीच्या नावे असेलेली सुमारे १०५.६४ हे. जमीन सुमारे ७३ व्यक्तींच्या नावे हस्तांतरीत करण्यात आली होती. यासंदर्भात चौकशी अहवालातील सूचनेप्रमाणे संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करमाळा (जि.सोलापुर) तालुक्यातील श्री आदिनाथ व श्री मकाई सहकारी साखर कारखान्यांनी कामगारांचे देयके थकविल्याबाबत**

**(२४) १३९८०१ (१५-०७-२०१९). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापुर) तालुक्यातील श्री.आदिनाथ व श्री.मकाई सहकारी साखर कारखान्यांनी गत ३ वर्षापासून कामगारांचे पगार वारंवार मागणी करुनही दिले नसल्याने बहुतांश कामगार साखर कारखाना प्रशासनाविरुध न्यायालयात गेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी कारखान्याकडून कामगारांच्या पगारातून फंडाच्या नावाखाली परस्पर रक्कम कपात केली जाते परंतू सदर रक्कम खात्यात वर्गीत केली जात नाही तसेच सेवानिवृत्त ९० कामगारांची अंतिम व पी.एफ देयके दिली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कारखान्यातील कामावर असताना मयत झालेल्या कामगारांना १ दिवसाचा पगार दिला जातो परंतु कारखान्यातील कामावर असताना मयत झालेल्या २७ कामगारांच्या नातेवाईकास १ दिवसाचा पगार कपात करुनही दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागण्याच्या अनुषंगाने कामगारांची आर्थिक, मानसिक व शारीरिक पिळवणूक करत असल्याने आदिनाथ व मकाई सहकारी साखर कारखाना संचालक मंडळावर शासनाने कोणती कायदेशीर वा दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (२६-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) मे.आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि., यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ पासून कारखान्यातील कामगारांचा प्रॉव्हीडंट फंड भरलेला नाही. श्री.आदिनाथ सहकारी साखर कारखान्यातील ५८ कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असून सदर कर्मचा-यांची रु.१.५४ कोटी रकमेची अंतिम देयके अदा करणे बाकी आहे. तसेच मे.मकाई सहकारी साखर कारखाना लि., यांनी कारखान्यातील कर्मचा-यांचा माहे, फेब्रुवारी, २०१८ पासून भविष्य निर्वाह निधी भरलेला नाही. या कारखान्यात मागील ३ वर्षात एकूण ८ कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांची अंतिम रक्कम कारखान्याकडून देण्यात आलेली नाही.

(३) मे.आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि., या कारखान्यात ७ कर्मचारी मयत झाले असून त्यांच्या वारसास प्रत्येकी रु.१,००,०००/- (एक लाख) प्रमाणे एकूण ७,००,०००/- (सात लाख) रुपये देण्यात आले आहेत. तर रु.१९ लाख अद्याप देय आहेत. मे.मकाई सहकारी साखर कारखाना लि., या कारखान्यात एकूण ०५ कर्मचारी मयत झाले असून त्यापैकी केवळ एका कामगाराच्या कुटुंबास मदतनिधी देण्यात आला आहे व उर्वरित ०४ कामगारांचा मदतनिधी देणे अद्याप बाकी आहे.

(४) मे.आदिनाथ सहकारी साखर कारखाना लि., आणि मे.मकाई सहकारी साखर कारखाना लि., या दोन्ही साखर कारखान्यांमध्ये किमान वेतन अधिनियम १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६, उपदान प्रदान अधिनियम, १९७२ इत्यादी कामगार कायद्यांतर्गत आढळून आलेल्या त्रुटींबाबत पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचवटी (नाशिक) येथील शरदचंद्र बाजार समिती परिसरात विवाहितेवर झालेला अत्याचार**

**(२५) १३९८२९ (१३-०७-२०१९). श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचवटी (नाशिक) येथील शरदचंद्र बाजार परिसरात २२ वर्षीय विवाहित महिलेचे पोलीसांच्या समक्ष बळजबरीने रिक्षातून अपहरण होत असताना, पोलीसांनी आरोपीला बोलावूनही अधिक चौकशी न करता आर्थिक व्यवहार करुन सोडून दिल्यामुळे दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास सदर महिलेवर रात्रभर अज्ञात व्यक्तींकडून सामुहिक लैंगिक अत्याचार करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर घटना ही पोलीसांच्या अक्षम्य चुकीमुळे झाल्यामुळे सदर पोलीसांवर व या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१९) :** (१) होय, दिनांक ३१/०३/२०१९ रोजी पिडीत महिलेवर लैंगिक अत्याचार करण्यात आला.

(२) व (३) फिर्यादी पिडीत महिलेने दिलेल्या तक्रारीवरून पंचवटी पोलीस ठाणे, नाशिक शहर येथे गु.र.नं. ३०३/२०१९ भादंवि कलम ३६६, ३७६ (ड) सह अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक सुधारीत कायदा सन २०१५ चे कलम ३ (१) (W), ३ (२) (V A) अन्वये

आरोपीतांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपीतांना अटक करण्यात आली असून सद्यस्थितीत आरोपी क्र. १ ल मा.न्यायालयाच्या आदेशान्वये जामीनावर असून आरोपी क्र. २ हा सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.

सदर प्रकरणामध्ये दोन पोलीस कर्मचा-यांचा बेजबाबदारपणा निष्पन्न झाल्यामुळे अधिक चौकशी करून संबंधितांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घाटकोपर येथील साईनाथ शिक्षण संस्थेचे संस्थापक यांनी महिला शिक्षिकेस शिवीगाळ केल्याबाबत**

**(२६) १३९९२० (१३-०७-२०१९). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातव्या वेतन आयोगातील थकीत रक्कम शाळेच्या इमारत बांधकामास देण्यास महिला शिक्षकांनी नकार देताच घाटकोपर येथील अनुदानित साईनाथ शिक्षण संस्थेचे संस्थापक श्री.नामदेव घाडगे यांनी भर सभेतच अश्लील भाषा वापरत शिवीगाळ केल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थेतील शिक्षिका श्रीमती विद्या चालक यांनी घाटकोपर पोलीस ठाण्यात श्री.नामदेव घाडगे यांच्या विरोधात दिनांक १० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित संस्था चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) फिर्यादी यांनी दिनांक ०९/०४/२०१९ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून गु.र.क्र. २१७/ १९ भादवि कलम ५०९ अन्वये तसेच अन्य सह शिक्षिका यांनी दिनांक १८/०४/२०१९ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून गु.र.क्र.२३९/१९ भादवि कलम ३५४(अ) अन्वये संस्थाचालक यांचेविरूध्द घाटकोपर पोलीस ठाणेस गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. दोन्ही गुन्ह्यात आरोपीत संस्थाचालक याला अटक करण्यात आलेली असुन सध्या आरोपी हा मा. न्यायालयाच्या आदेशान्वये जामीनावर मुक्त आहे. सद्यस्थितीत दोन्ही गुन्ह्यांचा पोलीस तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील रेकॉल्ड थर्मो प्रा.लि. या कंपनीने कामगारांना बडतर्फ केल्याबाबत**

**(२७) १३९९९२ (१५-०७-२०१९). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील सन १९९८ पासून कार्यरत असलेल्या रेकॉल्ड थर्मो प्रा.लि. या कंपनीने एकूण १२२ कामगार, ४८० कंत्राटी कामगार, ७० ट्रेनी व १५० स्टाफ मेंबर इतके कर्मचारी कार्यरत असताना उत्पादनाची मागणी घटत असल्याने कंपनी तोट्यात जात असल्याचे कारण सांगून कायमस्वरूपी कामगारांना तडकाफडकी बडतर्फ केल्याची घटना माहे नोव्हेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्पादनाला मार्केट मध्ये मागणी असूनही कंपनीने तोट्याचे खोटे कारण सांगून उत्पादनाचे आउट सोर्सिंग करण्याचे धोरण अवलंबविल्यानेच कामगारांना कामावरून काढून टाकल्याने कामगारांनी अनेकदा मागणी करूनही कंपनी प्रशासनाने दखल न घेतल्याने न्याय मिळण्यासाठी दिनांक १ मे, २०१९ रोजी पासून साखळी उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अचानक नोकरी गेल्याने कामगारांच्या कुटुंबाची मोठी आर्थिक अडचण तयार झाल्याने कामगारांना योग्य न्याय द्यावा अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री तसेच कामगार मंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तसेच कामगारांच्या मागणीच्या अनुषंगाने तडकाफडकी बडतर्फ करुन बेरोजगार केलेल्या कामगारांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (२६-०८-२०१९) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) कामगारांच्या मागणीच्या अनुषंगाने तडजोड घडवून आणण्याच्या दृष्टीने उपविभागीय अधिकारी खेड, अपर कामगार आयुक्त, पुणे यांचे कार्यालयात वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. तसेच मा.मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८/०३/२०१९ रोजी बैठक घेण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय कार्यालयाच्या वेळांमध्ये आणि कामकाजाच्या आठवड्यात बदल करण्याबाबत**

**(२८) १४००५८ (११-०७-२०१९). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय कार्यालयाच्या वेळांमध्ये आणि कामकाजाच्या आठवड्यात बदल करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बदलाचे स्वरुप काय आहे व त्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१९) :** (१) होय.
(२) शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा करण्याबाबत तसेच कार्यालयीन कामकाजाची वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तथापि याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंचवटी ग्रामीण पोलीस मुख्यालयाजवळील (जि.नाशिक) पोलीस वसाहतीमध्ये असलेल्या भारतीय स्टेट बँकचे एटीएम यंत्राची अज्ञात चोरट्यांनी तोडफोड केल्याबाबत**

**(२९) १४०१०३ (१३-०७-२०१९). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील पंचवटी ग्रामीण पोलीस मुख्यालयाजवळील पोलीस वसाहतीमध्ये असलेल्या भारतीय स्टेट बँकचे एटीएम कक्षात जाऊन अज्ञात चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह एटीएम यंत्राची तोडफोड केल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी गुन्हा दाखल करून संबंधीत चोरट्यांना अटक करून त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) आडगाव पोलीस स्टेशन मध्ये गुरनं २८४/२०१९ भादंविक ३८०, ५११, ४२७ प्रमाणे दि.१०.०५.२०१९ रोजी गुन्हा दाखल आहे. अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सद्यस्थितीत गुन्हा तपासावर आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामीण व शहरी भागात उभ्या असलेल्या वाहनांच्या काचा फोडून किंमती ऐवज चोरी होत असल्याबाबत**

**(३०) १४०११२ (१३-०७-२०१९). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामीण व शहरी विशेषत: खारघर परिसरात रस्त्यालगत तसेच हॉटेलबाहेर उभ्या असलेल्या वाहनांच्या काचा फोडून किंमती ऐवज चोरी होणाच्या प्रकारात दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहनांमधील रोख रक्कम, लॅपटॉप, किंमती वस्तुंच्या बॅगा तसेच महत्त्वाची कागदपत्रे चोरी झाल्याच्या घटनांची नोंद खारघर पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किती वाहनांच्या काचा फोडून चोरी झाल्याच्या घटनांची नोंद खारघर पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आली आहे व किती चो-यांचा तपास करण्यात आलेला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल तालुक्यातील वाढत्या चोऱ्यांना प्रतिबंधीत करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०१९) :** (१), (२) व (३) पनवेल शहर, खारघर व तळोजा पोलीस ठाणे येथे अनुक्रमे २, ८ व ३ गुन्हे दाखल झाले आहेत. पनवेल शहर येथील एक गुन्हा दाखल झाला असून १ गुन्ह्याचे एन. सी. फायनल मा.न्यायालयात पाठविण्यात आले आहे. पनवेल ग्रामीण येथे अशा प्रकारचे गुन्हे दाखल नाहीत.

(४) पनवेल तालुक्यातील वाढत्या चोऱ्यांना प्रतिबंधित करण्यासाठी सदर परिसरात दिवसा रात्री पोलीस गस्त करण्यात येत आहे. तसेच वाहनांमध्ये किंमती साहित्य व रोख रक्कम ठेवू नये याबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाणगाव (जि.पालघर) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील**
**अनुसूचित जाती\जमातीतील विद्यार्थ्यांच्या संख्येबाबत**

**(३१) १४०२९३ (११-०७-२०१९). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाणगाव (जि.पालघर) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय) या संस्थेत सध्या कोणकोणत्या विषयात, किती विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, त्यापैकी अनुसूचित जमातीचे किती व अनुसूचित जातीचे किती आहेत,

(२) असल्यास, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी प्रत्येकी किती जागा राखून ठेवलेल्या होत्या, त्यापैकी किती भरल्या व किती रिकाम्या आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रमाण पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०८-२०१९) :** (१) शासन निर्णय दि.१४.०५.२०१५ मधील प्रवेश नियमावली नुसार ऑगस्ट २०१५ प्रवेश सत्रापासून राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेशाची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. त्यानुसारच औ.प्र.संस्था, वाणगांव या आदिवासी उपयोजनेंतर्गत कार्यरत संस्थेतील प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. औ.प्र.संस्था, वाणगांव या संस्थेत सर्व व्यवसायात १००% प्रवेश झालेले असून सध्या प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे:-

| व्यवसायाचे नांव | मंजूर व भरलेल्या जागा | सद्यस्थितीत पटावरील प्रशिक्षणार्थी | | |
|---|---|---|---|---|
| | | अनुसूचित जमाती | अनुसूचित जाती | इतर |
| संधाता | ४२ | ३० | १ | २ |
| सुतारकाम | २६ | १७ | ० | ५ |
| नळकारागीर | २६ | १६ | १ | ४ |
| यांत्रिक डिझेल | ४२ | ३० | १ | ३ |
| प्लास्टिक प्रोसेसिंग ऑपरेटर | ४२ | ३१ | १ | २ |
| कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रॅमिंग असिस्टंट | ५२ | ३७ | १ | ७ |
| इंटेरिअर डिझाईनिंग ॲण्ड डेकोरेशन | २६ | १५ | ० | ७ |
| सुईंग टेक्नॉलॉजी | २१ | १८ | १ | २ |
| यांत्रिक मोटारगाडी | ४२ | २६ | ० | ११ |
| तारतंत्री | ४२ | ३३ | १ | २ |
| वीजतंत्री | ४२ | ३२ | ० | ६ |
| यांत्रिक प्रशितन व वातानुकूलीकरण | ५२ | ३५ | ३ | ८ |
| जोडारी | ४२ | ३२ | ० | ९ |
| मशिनिष्ट | ३२ | २२ | २ | ५ |
| मशिनिष्ट ग्राईंडर | ३२ | १९ | ५ | ३ |
| कातारी | ६४ | ३१ | २ | २० |
| टूल ॲण्ड डाय मेकर | ४२ | २६ | १ | ७ |
| इलेक्ट्रॉनिक्स मेकॅनिक | २६ | १५ | २ | ८ |
| मेकॅनिक मशिन टूल मेंटेनन्स | ४२ | २६ | ० | ११ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| इन्फॉर्मेशन ॲण्ड कम्युनिकेशन टेक्नालॉजी सिस्टीम मेंटेनन्स | २६ | १९ | ० | ३ |
| एकूण | ७६१ | ५१० | २२ | १२५ |

(२) औ.प्र.संस्था, वाणगांव येथे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या राखीव जागांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| मंजूर जागा | अनुसूचित जमाती | | | अनुसूचित जाती | | | इतर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राखीव जागा (७५%) | भरलेल्या जागा | रिक्त जागा | राखीव जागा (३.२५%) | भरलेल्या जागा | रिक्त जागा | राखीव जागा (२१.७५%) | भरलेल्या जागा | रिक्त जागा |
| ७६१ | ५७८ | ५१० | ६८ | २३ | २२ | १ | १६० | १२५ | ३५ |

इतर (अनु.जाती व इतर -२५% मध्ये) गुणवत्तेनुसार प्रवेशित उमेदवारांचा समावेश करण्यात आला आहे.

(३) ऑगस्ट २०१५ पासून महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येते. संस्थास्तरावर तसेच प्रादेशिक कार्यालयाचे स्तरावरुन समाजात सदर योजनेसंदर्भात (शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना) जागृती करणेबाबत कार्यक्रम हाती घेतले जातात. अनुसूचित जमातीच्या प्रशिक्षणार्थ्यांना आदिवासी विभागाकडून निर्वाहभत्ता देण्यात येतो. तसेच अनुसूचित जातीच्या प्रशिक्षणार्थ्यांना समाजकल्याण विभागामार्फत विद्यावेतन/शिष्यवृत्ती देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### श्री क्षेत्र शिंगणापूर हे तिर्थक्षेत्र (जि.अहमदनगर) सध्या अवैध धंद्याचे केंद्र बनल्याबाबत

**(३२) १४०४८७ (१३-०७-२०१९). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र शिंगणापूर हे तिर्थक्षेत्र सध्या अवैध धंद्याचे केंद्र बनले आहे, स्थानिक पोलीस आणि अवैध धंदेचालक यांच्यातील संबंधामुळे येथे ऑनलाईन मटका आणि बिंगो जुगार उघडपणे चालवला जातो आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार यास जबाबदार असणा-या अधिकारी व अवैध धंदे करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१९) :** (१) व (२) श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे कोणत्याही प्रकारचा ऑनलाईन मटका व बिंगो जुगार हे अवैध धंदे चालु नाहीत. तथापि श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे इतर मटका जुगाराचे संदर्भात छापे टाकून खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

| अ.नं. | सन | दाखल केसेस संख्या | आरोपी अटक संख्या | जप्त मुद्देमाल (किंमत रूपये) |
|---|---|---|---|---|
| १ | २०१६ | २० | ४८ | रू.१,३१,७५० |
| २ | २०१७ | १३ | २१ | रू.११,४८० |
| ३ | २०१८ | १५ | २४ | रू.१६,७२५ |
| ४ | २०१९ माहे मे अखेर | १२ | २५ | रू.१९,९६० |

(३) विलंब झालेला नाही.

---

## लामकानी (ता.जि.धुळे) परिसरातील आदिवासी भिल्ल समाजाच्या नागरीकांवर दारुबंदीच्या नावाखाली खोटे गुन्हे नोंदविण्यात येत असल्याबाबत

**(३३) १४०५०९ (१५-०७-२०१९). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लामकानी (ता.जि.धुळे) परिसरात वाळु तस्करी, जुगार, बनावट दारु विक्री इत्यादी अवैध धंदे सुरु असल्याची बाब नुकतीच उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील आदिवासी भिल्ल समाजाच्या नागरीकांना दारुबंदीच्या नावाखाली वेठीस धरले जात असून त्यांच्यावर खोटे गुन्हे नोंदविण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नूसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०७-२०१९) :** (१) हे खरे नाही.

लामकानी ता.जि.धुळे परिसरात अवैध धंदे करणारे इसमांविरुध्द स्थानिक पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकरवी वेळोवळी परिणामकारक कारवाई करण्यात आली आहे. सन २०१७ पासुन ते माहे मे २०१९ पावेतो मुंबई दारुबंदी अधिनियम कायद्यान्वये ९ गुन्हे दाखल करून याप्रकरणी ५ आरोपीतांना अटक करून ६३३२८/- रुपये कि. चा अवैध दारुचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच मुंबई जुगार कायद्यान्वये एकुण ७ गुन्हे दाखल करून २०५३५०/- रुपये कि. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन २२ आरोपींविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

अशा प्रकारे दारुबंदीच्या नावाखाली आदिवासी भिल्ल समाजातील लोकांवर कोणतेही खोटे गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत.
(४) विलंब झालेला नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यासह राज्यात स्थलांतरित झालेल्या मजुरांनाही मतदानाचा हक्क मिळणेबाबत**

**(३४) १४०५९९ (१५-०७-२०१९). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यासह राज्यात सध्या दुष्काळी परिस्थिती पाहता मजूर वर्ग अस्थाई स्वरूपात कामासाठी अन्यत्र स्थानांतरित झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचे बुलढाणा जिल्ह्यातील प्रमाण सुमारे २० टक्के आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शासनाने आगामी निवडणुकात स्थलांतरित झालेले मतदार मतदानापासून त्यांच्या हक्कापासून वंचित राहू नयेत यासाठी शासनाने त्यांचे सर्वेक्षण करून शासकीय खर्चाने मतदानाचे कर्तव्य बजावण्यासाठी त्यांना आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) स्थलांतरित मतदारांना शासकीय खर्चाने मतदानासाठी आणणेबाबत कोणतीही तरतूद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाण्यातील धर्मादाय आयुक्तालयाकडे नोंद असलेल्या संस्थांनी**
**ताळेबंद अहवाल सादर न केल्याबाबत**

**(३५) १४०९४५ (१५-०७-२०१९). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील धर्मादाय आयुक्तालयाकडे नोंद असलेल्या संस्थांनी ताळेबंद अहवाल, बदल अर्ज व अन्य कागदपत्रांची पूर्तता केल्याचा अहवाल धर्मादाय आयुक्तांकडे सादर केला नसल्याचे माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धर्मादाय आयुक्तांकडे नोंद असलेल्या अशा किती संस्थांनी अहवाल सादर केलेला नाही,

(३) अहवाल सादर न केलेल्या संस्थांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ठाणे कार्यालयात सद्यस्थितीत ५३,२५९ एवढ्या नोंदणीकृत संस्था आहेत. मागील ५ वर्षात ९६९८ संस्थांनी हिशोब पत्रके व बदल अर्ज ठाणे कार्यालयात दाखल केलेले नाही.
(३) अहवाल सादर न केलेल्या ९६९८ न्यासांची नोंदणी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ (३) A नुसार नोंदणी रद्द करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) येथील हुतात्मा स्मारकावर स्वातंत्र्य सैनिकांची नावे कोरण्याबाबत**

**(३६) १४०९६४ (१५-०७-२०१९). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील ७ स्वातंत्र्य सैनिकांना इंग्रज सरकारने फाशीची शिक्षा ठोठावली होती त्यापैकी २ जणांचा कैदेत मृत्यु झाला तर ५ जणांना फाशीची शिक्षा झाली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्वातंत्र्य सैनिकांची नावे येथील हुतात्मा स्मारकावर कोरण्याबाबत मा.स्थानिक आमदारांनी वारंवार मागणी करुनही दुर्लक्ष करण्यात आले आहे, त्यामुळे येथील जनतेत असंतोष व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मालेगांव येथील हुतात्मा स्मारकावर सदरहु स्वातंत्र्य सैनिकांची नावे लवकरात लवकर कोरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१९) :** (१) होय.
(२) नाही.
(३) मालेगाव शहरात हुतात्मा स्मारकावर नावे करण्यावरून हिंदू-मुस्लीम समाजात तेढ निर्माण होऊ नये याकरता सदर प्रकरणी परिस्थिती जैसे थे ठेवावी असा शासन स्तरावर निर्णय घेण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील असंघटीत कामगारांची नोंदणी करणेबाबत**

**(३७) १४०९९२ (१५-०७-२०१९). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यशासनाच्या कामगार विभागामार्फत राज्यातील असंघटीत कामगारांसाठी मंडळाची निर्मिती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाच्या कामगार विभागामार्फत राज्यातील असंघटित कामगारांसाठी शासन अधिसुचना, दिनांक ३ एप्रिल, २०१८ अन्वये महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन करण्यात आले आहे

(३) असल्यास, शासन या असंघटीत कामगारांची नोंदणी केव्हा करणार आहे,

(४) असल्यास, कामगारांची नोंदणी करण्याबाबत अद्यापपर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (१३-०८-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) असंघटीत कामगारांची नोंदणी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. कामगार सुविधा केंद्रांसाठी निधी प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील धर्मदायी रूग्णालये गरीब रूग्णांना १० टक्के राखीव खाटा योजनेखाली कुठलीही सवलत देत नसल्याबाबत**

**(३८) १४११४४ (११-०७-२०१९). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४५३ धर्मदाय रुग्णालयांनी सन २०१८ मध्ये १९१ कोटी रूपये गरीब रूग्णासाठी खर्च केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ मध्येच राज्यातील धर्मदायी रूग्णालयांनी गरीब रुग्णांवर त्यांच्याकडील अतिरिक्त ६६ कोटी रूपये खर्च केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरातील धर्मादाय रूग्णालयांनी ४० कोटी रूपये सन २०१८ मध्ये तोट्यात असल्याचे दाखविले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे शहरातील रूबी हॉल क्लिनिक, जाहांगिर हॉस्पिटल, मंगेशकर हॉस्पिटल, संचेती हॉस्पिटल, पुणा हॉस्पिटल ही रूग्णालये गरीब रूग्णांना १० टक्के राखीव खाटा योजनेखाली दिनांक १ एप्रिल २०१९ पासुन रूग्णालय तोट्यात असल्याचे कारण दाखवुन कुठलीही सवलत देत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून पुढे कोणती योग्य ती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०१९) :** (१) नाही.

राज्यात ४५३ धर्मादाय रुग्णालये नसून ४३० धर्मादाय रुग्णालये आहेत. सदर ४३० धर्मादाय रुग्णालयांनी सन २०१८ अखेर, निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांवर रु.२,५८,५५,७३,४८०/- (रु.दोनशे अठ्ठावन्न कोटी पंच्चावन लाख त्र्याहत्तर हजार चारशे ऐंशी फक्त) इतका खर्च निर्धन रुग्ण निधी मधून केलेला आहे.

(२) होय.

सन २०१८ या वर्षी निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांकरिता निर्धन रुग्ण निधी खात्यामध्ये एकूण रु. १९१,६०,२५,६२२/- (रु. एकशे एक्क्यानव कोटी साठ लाख पंचवीस हजार सहाशे बावीस फक्त) इतकी रक्कम जमा करण्यात आली होती. सदर निधीतून राज्यातील धर्मादाय रुग्णालयांनी निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांवर रु.२५८,५५,७३,४८०/- (रु.दोनशे अठ्ठावन्न कोटी पंच्चावन लाख त्र्याहत्तर हजार चारशे ऐंशी फक्त) इतका खर्च केलेला आहे. सबब, निर्धन रुग्ण निधी खात्यामध्ये जमा रु.१९१,६०,२५,६२२/- पेक्षा रु.६६,९५,४७,८५८/- (रु.सहासष्ठ कोटी पंच्याण्णव लाख सत्तेचाळीस हजार आठशे अठ्ठावन्न फक्त) इतकी रक्कम अतिरिक्त खर्च करण्यात आलेली आहे.

(३) नाही.

पुणे जिल्ह्यातील एकूण ५७ धर्मादाय रुग्णालयांकडून माहे जानेवारी २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीत निर्धन रुग्ण निधी खात्यामध्ये एकूण रु.४९,५१,९५,७६४/- (रुपये एकोणपन्नास कोटी एक्कावन्न लाख पंच्च्याण्णव हजार सातशे चौसष्ठ फक्त) जमा करण्यात आले. त्यापैकी, निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांवर रु.५६,८०,१०,८४४/- (रुपये छप्पन्न कोटी ऐंशी लाख दहा हजार आठशे चौरेचाळीस फक्त) इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. सबब, निर्धन रुग्ण निधी खात्यामध्ये जमा रकमेपेक्षा रु.७,२८,१५,०८०/- (रुपये सात कोटी अठ्ठावीस लाख पंधरा हजार ऐंशी फक्त) इतकी रक्कम अतिरिक्त खर्च करण्यात आलेली असल्याने पुणे जिल्हयातील निर्धन रुग्ण निधी खाते रु.७,२८,१५,०८०/- इतक्या रक्कमेने वजावटीत असल्याचे दिसुन येते.

(४) नाही.

पुणे जिल्ह्यातील ५७ धर्मादाय रुग्णालये यासंदर्भातील मा.उच्च न्यायालयाच्या योजनेतील तरतुदींनुसार निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी एकूण खाटांच्या प्रत्येकी १० टक्के खाटा राखीव ठेवत असून, सदर रुग्णांवर निर्धन रुग्ण निधी खात्यातुन उपचार केले जातात. जर एखादया पात्र रुग्णावर धर्मादाय रुग्णालयांनी योजनेतील तरतुदीनुसार उपचार करण्यास नकार दिल्याची तक्रार प्राप्त झाल्यास, सदर तक्रार अर्ज योजनेनुसार गठीत देखरेख समितीसमोर कार्यवाहीसाठी ठेवण्यात येऊन त्यावर उचित निर्णय घेण्यात येतो, असे धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापुर) येथील श्री विठ्ठल मंदिराच्या छतावरील बांधकामामुळे मंदिराच्या वास्तूला धोका निर्माण झाल्याबाबत**

**(३९) १४१३५६ (११-०७-२०१९). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापुर) येथील श्री विठ्ठल मंदिराच्या छतावर टाकण्यात आलेला स्लॅब आणि अनेक ठिकाणी केलेल्या अस्ताव्यस्त बांधकामामुळे मंदिराच्या छतावर भार येऊ लागल्याने मूळ मंदिराच्या वास्तूला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण मंदिराचे "स्ट्रक्चरल ऑडिट" करण्यात आले आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१९) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या छतावर स्लॅब टाकण्यात आला होता. तथापि, स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये दिलेल्या अहवालानुसार सप्टेंबर २०१५ मध्ये स्लॅब काढण्यात आले.

(२) मंदिराचे "स्ट्रक्चरल ऑडिट" मध्ये कॉलम आणि बीम्स् मध्ये चिरा पडलेल्या आहेत. छतावरुन पाणी झिरपत असल्याचे नमूद करुन मंदिराला धोका निर्माण होवू शकतो असे नमूद करण्यात आले आहे.

मंदिराच्या संवर्धनासाठी राज्य पुरातत्व विभागाने दिलेल्या निर्देशानुसार व त्यांनी सूचविलेल्या आर्किटेक्ट कडून आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. तद्नंतर आर्किटेक्ट व पुरातत्व विभाग यांच्या मार्गदर्शना खाली संवर्धनाची कार्यवाही सुरु करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कफ परेड (मुंबई) परिसरात गुंगीचे औषध देऊन विवाहितेवर केलेला अत्याचार**

**(४०) १४१४९० (१५-०७-२०१९). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कफ परेड (मुंबई) परिसरातील पायधुनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका विवाहित महिलेला गुंगीचे औषध देऊन श्री.रंजीत चौधरी या आरोपीने अत्याचार केला असून त्याचे फोटो व चित्रिकरण करुन पिडीत महिलेकडून रुपये १ लाख ८० हजाराची खंडणी घेतल्याची बाब दिनांक ८ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोपी पिडीत महिलेला तिच्यावर झालेल्या लैंगिक अत्याचाराचे फोटो व चित्रिकरण सोशल मिडियावर टाकून देण्याची भिती दाखवून गत २ वर्षापासून पिडीतीचे लैंगिक शोषण व वारंवार पैशांची मागणी करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने अत्याचार, धमकी व खंडणी यासारखे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगार श्री.रंजीत चौधरी व श्रीमती ऊर्मिला चौधरी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१९) :** (१), (२) व (३) फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून पायधुनी पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.नं. ८०/१९, कलम ३७६, ३२८, ५०६, ३४ भा.दं.वि. सह कलम ६६ (ई) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून यातील आरोपी क्र. १ यास अटक करण्यात आली. सद्यस्थितीत सदर गुन्ह्याचा पोलीस तपास चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना खाजगी औद्योगीक प्रशिक्षण संस्थेमध्ये (आयटीआय) शूल्क परतावा देण्याबाबत

**(४१) १४१७०४ (१५-०७-२०१९). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उदयोजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना खाजगी औद्योगीक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) मध्ये शुल्क परतावा देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावर निर्णय घेण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, केव्हा निर्णय घेतला व सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे, तद्नुसार शासनाने शूल्क परतावा देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पीपीपी योजनेंतर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास व खुल्या प्रवर्गातील (आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक) विद्यार्थ्यांकरिता "व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती" योजनेस मान्यता देण्याबाबतचा शासन निर्णय दि.२९.०५.२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

तसेच अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना लागु करण्याबातचे आदेश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक ०१/०८/२०१९ व आदिवासी विकास विभागाने दिनांक २९/०७/२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग या सामाजिक प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण प्रतिपुर्ती देण्याबाबतचा शासन निर्णय विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग यांचे कल्याण विभाग या विभागांमार्फत निर्गमित करावयाची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीक्षेत्र पंढरपूर (जि.सोलापूर) येथील मंदिर समितीकडील प्रलंबित कामांबाबत**

**(४२) १४२००६ (१५-०७-२०१९). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीक्षेत्र पंढरपूर (जि.सोलापूर) येथील श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर येथील भाविकांना ऑनलाईन दर्शनासाठी १०० रूपये शुल्क आकारण्याचा निर्णय मंदिर समितीने घेतला असल्याचे दिनांक १३ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तसेच ऑनलाईन दर्शन व्यवस्था, टोकन पध्दत व दर्शनासाठी उभारण्यात येणाऱ्या उड्डाण पुलाचे काम अद्यापही प्रलंबित असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकारी पदावर स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्तीही प्रलंबित असून प्रांत अधिकारी यांच्याकडे सदर पदाचा अतिरिक्त पदभार दिला असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, श्रीक्षेत्र पंढरपूर येथील मंदिर समिती प्रशासनाकडे प्रलंबित असलेली कामे पुर्ण होणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१९) :**(१) होय, हे अंशतः खरे आहे.
श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती यांच्या दिनांक १२/१/२०१९ रोजीच्या सभेत ऑन लाईन दर्शन बुकींगला सहा महिने प्रयोगिक तत्वावर प्रती भाविक रुपये १०० प्रमाणे देणगी आकारण्याचे ठरले होते. तथापि, समितीच्या दिनांक ११/०२/२०१९ रोजीच्या सभेत सदर निर्णयाची अंमलबजावणी न करण्याचा निर्णय घेण्यात आला.
(२) होय, हे ही अंशतः खरे आहे.
मोफत दर्शन व्यवस्था पूर्वी प्रमाणे सुरु आहे. तसेच दर्शनरांग व उड्डाण पुलाचे बांधकाम यासाठी विहित प्रक्रिया राबवून आषाढी यात्रा २०१९ नंतर सुरु करण्याचे समितीने नियोजित केले आहे.
(३) होय, हे खरे आहे.

(४) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या कार्यकारी अधिकारी या पदावर स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मांडवा (ता.अलिबाग, जि.रायगड) बंदरातून काढण्यात आलेल्या गाळाबाबत**

**(४३) १४२०१६ (१५-०७-२०१९). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मांडवा (ता.अलिबाग, जि.रायगड) बंदरातून मांडवा ते मुंबई अशी रोरो सेवा वर्षभरासाठी सुरू करण्यात येणार होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मांडवा येथील बंदरात गाळ साचल्यामुळे ही सेवा सुरू करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मांडवा बंदरातील गाळ काढण्यासाठी निविदा मागवून हा गाळ काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गाळ काढूनही रोरो सेवा सुरू झाली नसल्याने गाळ काढणाऱ्या कंपनीने किती गाळ काढला तसेच रोरो सेवा सुरू न झाल्याने या प्रकरणाची चौकशी करून संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०१९) :** (१) होय.
(२) ते (५) नवीन भाऊचा धक्का ते मांडवा या जलमार्गावर रो-रो फेरीबोट सेवा चालविण्यासाठी ऑपरेटरची निवड करण्यासाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रिये संदर्भात महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाविरुध्द, मा.उच्च न्यायालयात दावा दाखल करण्यात आला. सदर दाव्याच्या अनुषंगाने मा.न्यायालयाने दिनांक ३१.८.२०१८ रोजी “जैसे थे” परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिल्याने ऑपरेटरची निवड करणे शक्य झाले नाही. त्यामुळे, ही सेवा सुरु करता आली नाही.
आता, मा.उच्च न्यायालयाने दि. ३०.५.२०१९ रोजी सदरचा दावा रद्द करुन निकाली काढला असून त्याबाबतचे आदेश दिनांक १५.६.२०१९ रोजी पारित केले आहेत.

---

**अकोट फैल परिसरातील (जि.अकोला) कामगार कल्याण केंद्र बंद करण्यात येत असल्याबाबत**

**(४४) १४२०५१ (१५-०७-२०१९). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्थानिक अकोट फैल परिसरातील (जि.अकोला) कामगार कल्याण केंद्र बंद करण्यात येऊ नये असे निवेदन नागरिकांनी मा.जिल्हाधिकारी यांना देऊन सुद्धा सदर केंद्र बंद करण्याचा आदेश माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी अकोला यांना देण्यात आलेल्या निवेदनावर शेकडो नागरिकांच्या स्वाक्षऱ्या असून सुद्धा केंद्र बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर केंद्र पूर्ववत सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. संजय कुटे (२७-०८-२०१९) :** (१) स्थानिक अकोट फैल परिसरातील (जि.अकोला) कामगार कल्याण केंद्र बंद करण्यात येऊ नये, असे निवेदन मा. जिल्हाधिकारी यांना प्राप्त झाले आहे. मात्र केंद्र बंद करण्याचा आदेश देण्यात आलेला नाही.
(२) व (३) मंडळाच्या प्रशासकीय खर्चावर नियंत्रण आणण्याची आवश्यकता असल्याने केंद्र निहाय कामगार नोंदणी संख्येच्या अनुषंगाने आढावा घेण्याची कार्यवाही मंडळ स्तरावर सुरु आहे. तथापि, सदर केंद्रे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेरपिंगळाई (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथे कायमस्वरुपी पोलीस चौकी देण्याबाबत**

**(४५) १४२०७७ (१५-०७-२०१९). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरपिंगळाई (ता.मोर्शी, जि.अमरावती) येथील लोकसंख्या विचारात घेवुन या ठिकाणी कायमस्वरुपी पोलीस चौकी देण्याबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक, अमरावती यांना दिनांक ५ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु गावास कायमस्वरुपी पोलीस चौकी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
नवीन पोलीस चौकी निर्माण करण्यासाठी मागील तीन वर्षातील गुन्हयांची सरासरी २५ असणे आवश्यक आहे. पोलीस अधीक्षक, अमरावती यांच्या अहवालानुसार प्रस्तावित नेरपिंगळाई पोलीस चौकीच्या हद्दीतील सन २०१६, सन २०१७ व सन २०१८ या मागील तीन वर्षातील गुन्हयांची सरासरी १८ आहे. सबब नेरपिंगळाई येथे पोलीस चौकी देय होत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंजवडी (जि.पुणे) येथील कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स या कंपनीतील एका अभियंत्याने वरिष्ठांच्या छळास कंटाळून केलेली आत्महत्या

**(४६) १४२१२० (१५-०७-२०१९). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंजवडी (जि.पुणे) येथील कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स या कंपनीतील माहिती तंत्रज्ञान (आयटी) अभियंता चेतन वसंतराव जायले यांनी वरिष्ठांच्या छळास कंटाळून माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आत्महत्या केल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार सदर प्रकरणातील दोषी आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१९) :** (१) व (२) होय हे खरे आहे. हिंजवडी (जि.पुणे) येथील कॉग्निझंट टेक्नॉलॉजी सोल्युशन्स या कंपनीतील माहिती तंत्रज्ञान (आयटी) अभियंता चेतन वसंतराव जायले यांनी वरिष्ठांच्या मानसिक त्रासाला कंटाळून दिनांक १०.०४.२०१९ रोजी आत्महत्या केली. मयताने मरणापूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीच्या अनुषंगाने व फिर्यादिने दिलेल्या तक्रारीनुसार दोन आरोपींविरुध्द चतु:श्रुंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे रजि.नं.३९४/२०१९ भा.दं.वि.सं. कलम ३०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यात एका आरोपीला मा.न्यायालयाने अटकपुर्व जामिनावर मुक्त केले असून दुसरा आरोपी अद्यापपर्यंत मिळून न आल्याने त्यास अद्यापपर्यंत अटक करण्यात आली नाही. सदर दाखल गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्यास विलंब होत असल्याबाबत

**(४७) १४२३९३ (१५-०७-२०१९). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याची घोषणा करून जवळपास अडीच वर्षे झाल्यानंतरही विमानतळ उभारणीबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमानतळाच्या उभारणीकरीता शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१९) :** (१) नाही. हे खरे नाही.

(२) प्रस्तावित पुरंदर, जि.पुणे विमानतळाच्या उभारणीसाठी स्थळ निश्चिती करण्यात आली आहे. सदर जागेचे OLS सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे व त्यास भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने मंजुरी दिली असून या जागेस केंद्र शासनाच्या विमानन मंत्रालयाच्या सुकाणू समितीने साईट क्लिअरन्स दिलेला आहे. तसेच, सदर प्रस्तावित विमानतळास केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयाचा नाहरकत परवाना प्राप्त झाला आहे. याखेरीज, प्रस्तावित विमानतळासाठी पर्यावरण नाहरकत व तत्सम परवानग्या प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

नवीन विमानतळाच्या पहिल्या टप्प्याच्या कामासाठी सिडको, एमआयडीसी, एमएडीसी, पीएमआरडीए यांची संयुक्त भागीदारी कंपनी स्थापन करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मूळडोंगरी तांडा (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथील रतन पुना चव्हाण यांनी केलेली आत्महत्या**

**(४८) १४२८८७ (१५-०७-२०१९). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूळडोंगरी तांडा (ता.नांदगांव, जि.नाशिक) येथील रतन पुना चव्हाण यांनी ऊसतोड ठेकेदाराच्या मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी दोषी आढळून येणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०१९) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी नांदगांव पोलीस स्टेशन येथे अ.मु.नं.३१/२०१९ सि.आर.पी.सी. १७४ अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर मृत्यूचे चौकशीअंती मयत रतन पुना चव्हाण यांनी आरोपी यांच्याकडून उसतोडी कामासाठी रुपये ९,८०,०००/- ची उचल घेतली होती. सदर पैशाची परतफेड करण्यासाठी आरोपी त्यांच्याकडे वारंवार तगादा लावत असे. तसेच त्यांचा अपमान होईल या उद्देशाने त्यांचा मानसिक छळ करुन मयतास आत्महत्या करण्यास भाग पाडले असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे आरोपीविरुध्द नांदगांव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.१३३/२०१९ भा.दं.वि.क. ३०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी फरार असून त्यास अटक करणेवर गुन्हा तपासावर प्रलंबित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई क्रिकेट असोसिएशनकडे मुंबई पोलीसांची रुपये २१.३४ कोटी रक्कम थकित असल्याबाबत**

**(४९) १४३०७९ (१२-०७-२०१९). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गत ७ वर्षापासुन झालेल्या विविध क्रिकेट सामन्यातील पोलीस बंदोबस्तापोटीचे एकुण रुपये २१ कोटी ३४ लाख रक्कमेचे शुल्क मुंबई क्रिकेट असोसिएशनने (एमसीए) अजुनही भरलेले नसल्याचे पुन्हा एकदा माहे मे, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकत्याच संपलेल्या आयपीएल क्रिकेट सामन्यांना पुरविण्यात आलेल्या बंदोबस्ताचे दर शासनाकडून अद्याप निश्चित केले नसल्याचे माहिती अधिकारातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०१९) :** (१) मुंबईत गत ७ वर्षापासुन झालेल्या विविध क्रिकेट सामन्यातील पोलीस बंदोबस्तापोटी मुंबई क्रिकेट असोसिएशनकडून येणे असलेली मूळ रक्कम रुपये १४,८२,७४,१७७/- व त्यावरील जून, २०१९ पर्यंतचे महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ मधील तरतूदीनुसार ९.५ % प्रमाणे चक्रवाढ पध्दतीने व्याज आकारुन रुपये २०,७७,१२,२०८/- एवढी रक्कम येणे बाकी आहे. सदरची रक्कम त्वरीत भरणा करण्यासंदर्भात पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई या कार्यालयाकडून अध्यक्ष, मुंबई क्रिकेट असोसिएशन यांना पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(२) व (३) होय. सदर पोलीस बंदोबस्ताचे दर हे दिनांक ०१.०४.२०१८ ते ३१.०३.२०१९ या कालावधीचेच असल्याचे आदेश गृह विभाग शासन निर्णय दिनांक १२.११.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यापुढील ठोक रक्कमचे दर निश्चित करण्याबाबतचे आदेश निर्गमित होणेसाठी शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील बेलोरा विमानतळाचे धावपट्टीच्या विस्तारीकरण व अनूषंगिक विकास कामांकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(५०) १४३२९७ (१५-०७-२०१९). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील बेलोरा विमानतळाचे धावपट्टीच्या विस्तारीकरण व अनूषंगिक विकास कामांकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या.यांनी आर्थिक वर्ष सन २०१९-२० करिता ६० कोटी रूपयांचे मागणी सामान्य प्रशासन विभागाच्या माध्यमातून नोंदविलेली असून

ते उपलब्ध करून देण्याबाबत मा.मंत्री वित्त व नियोजन यांना दिनांक २० मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधींनी पत्रान्वये मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, बेलोरा विमानतळाच्या धावपट्टी विस्तारीकरण व अनूषंगिक बाबींच्या विकास करण्याकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीद्वारे ३९.३३ कोटी रुपयांची निविदा दिनांक ६ मार्च २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रकाशित करून प्रीबिड मिटींग घेवून दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निविदा उघडून अंतिम करण्याबाबत कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत काय,
(३) असल्यास, सदरहु कामाकरीता सन २०१९-२० मध्ये ६० कोटी रूपयांची तरतुद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच धावपट्टीच्या विस्तारीकरणाच्या कामाला कधी सुरुवात करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) बेलोरा विमानतळाच्या धावपट्टी विस्तारीकरणासाठी निविदा प्रक्रिया राबवून दि.११.०७.२०१९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.
(३) बेलोरा विमानतळाच्या धावपट्टी विस्तारीकरणासाठी सन २०१९-२० या वर्षात रु.११,६६,६६०००/- इतका निधी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यानुसार धावपट्टी विस्तारीकरणाचे काम महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत सुरु करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.